आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२५ जून २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा सभापतीपदासाठी रालोआकडून माजी सभापती ओम बिर्ला तर विरोधी पक्षांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांचा अर्ज दाखल

- राजकीय आणीबाणीचा विरोध करणाऱ्या सर्वांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून आदरांजली

- विद्यार्थी आणि पालकांच्या समस्या जाणून घेण्यावर नीट संदर्भात केंद्र सरकारनं स्थापन केलेली समिती भर देणार

**आणि**

- टी २० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतासह इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तानचा प्रवेश / ऑस्ट्रेलिया स्पर्धेबाहेर

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं लोकसभा सभापतीपदासाठी ओम बिर्ला यांना पुन्हा संधी दिली आहे. आज त्यांनी सभापतीपदासाठी अर्ज भरला. गेल्या लोकसभेतही ते सभापती होते. विरोधकांकडून काँग्रेस खासदार के. सुरेश यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. या पदासाठी उद्या निवडणूक होणार आहे. स्वातंत्र्यापासून आतापर्यंत लोकसभेचे सभापती एकमतानं नियुक्त झाले आहेत. यंदा दोन उमेदवार रिंगणात असल्यानं पहिल्यांदाच निवडणूक होण्याची शक्यता आहे.

सभापतीपदाच्या उमेदवारावर सहमती व्हावी यासाठी सरकारनं विरोधकांशी चर्चा केली होती. केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंग आणि पीयूष गोयल यांनी

काँग्रेस नेते के सी. वेणुगोपाल आणि द्रमुक नेता टी. आर. बालू यांच्याशी चर्चा केली. राजनाथ सिंग यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनाही फोन करुन सत्ताधारीपक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची विनंती केली होती. पण विरोधकांनी उप सभापतीपदाच्या उमेदवाराचं नाव जाहीर करण्याची मागणी केली. उप सभापतीपदावरच्या उमेदवाराचं नाव योग्य वेळी जाहीर करू असं सत्ताधारी पक्षानं सांगितलं. त्यामुळं सभापतीपदाच्या उमेदवाराची नेमणूक एकमतानं करण्यावर सहमती झाली नाही.

सरकारच्या लोकसभा सभापतीपदाच्या उमेदवाराला आम्ही पाठिंबा द्यायला तयार आहोत. पण सरकारनं उप सभापती पद विरोधी पक्षाला द्यावं अशी मागणी सभागृहाचं कामकाज सुरू होण्यापूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली होती.

**<><><><><>**

१८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही नवनिर्वाचित खासदारांचे शपथविधी सुरू आहेत. काँग्रेस खासदार गोवाल पाडवी, श्यामकुमार बर्वे, बळवंत वानखेडे, भाजपाचे खासदार अनुप धोत्रे, शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अमर काळे यांनी आज शपथ घेतली. काँग्रेस खासदार शोभा बच्छाव, भाजपा खासदार स्मिता वाघ यांनी मराठीतून शपथ घेतली. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अहमदनगरचे खासदार निलेश लंके यांनी इंग्लीशमधून शपथ घेतली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, काल २६६ खासदारांनी शपथ घेतली होती. आज दुसऱ्या दिवशी उर्वरित खासदार शपथ घेत आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १९७५ मध्ये देशात लागू करण्यात आलेल्या राजकीय आणीबाणीचा विरोध करणाऱ्या सर्व स्त्री - पुरुषांना आदरांजली वाहिली आहे. सर्व भारतीयांना सन्मानिय असणाऱ्या संविधानाला अपमानित करत काँग्रेसनं जनतेच्या मुलभूत स्वातंत्र्याचं हनन केलं होतं, याची आठवण करून देणारा हा दिवस असल्याचं, प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

आगामी अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी ७वी अर्थसंकल्प पूर्व बैठक आज नवी दिल्ली इथं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विविध व्यापार आणि सेवा पुरवठादार प्रतिनिधींसोबत सीतारामन यांनी सविस्तर चर्चा केली. या बैठकीला केंद्रीय अर्थराज्य मंत्री पंकज चौधरी, मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंता नागेश्वरन, वित्त सचिव टी . व्ही. सोमनाथन तसंच आर्थिक व्यवहार विभागाचे आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे सचिव उपस्थित होते.

**<><><><><>**

अस्तित्वात असलेल्या दूरसंचार सेवा विकसित करण्यासाठी आणि सेवेत सातत्य राखण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं आज ९६ हजार कोटींहून अधिक रकमेच्या दूरसंचार स्पेक्ट्रमचा लिलाव सुरु केला आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेद्वारे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षा पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरळीतपणे पार पडाव्यात, यासाठी शिक्षण मंत्रालयाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय समितीची पहिली बैठक काल झाली. विद्यार्थी आणि पालकांच्या समस्या जाणून घेणं, हे समितीचं पहिलं प्राधान्य असून, त्यासाठी त्यांच्याशी संवाद

साधला जाईल, असं समितीचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांनी नवी दिल्ली इथं बातमीदारांना सांगितलं. विद्यार्थ्यांचा तणाव आणि समस्यांचं निराकरण करण्यासाठी एक मजबूत प्रणाली स्थापन करण्याचा समितीचा विचार असल्याचं ते यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या परीक्षा पद्धतीत सुधारणा सुचवण्यासाठी केंद्र सरकारनं इस्रोचे माजी अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. परीक्षेतल्या गैरव्यवहारांना आळा घालून कार्यक्षमता सुधारणं, सुरक्षेच्या नियमावलीत सुधारणा, तसंच संस्थेची रचना आणि कार्यपद्धतीचं पुनरावलोकन करण्याची शिफारस करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे.

**<><><><><>**

नीट-युजी प्रवेश परीक्षेतल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी सीबीआयनं बिहार, गुजरात आणि राजस्थानमधली ५ प्रकरणं हाती घेतली आहेत. सीबीआयनं गुजरात आणि बिहारमध्ये प्रत्येकी एक, तर राजस्थानमध्ये ३ प्रकरणं हाती घेतली असून, महाराष्ट्रातल्या लातूरमधल्या प्रकरणाची चौकशी सीबीआय हाती घेण्याची शक्यता आहे.

बिहार पोलिसांनी दाखल केलेला एफआयआर पेपरफुटी प्रकरणी असून, इतर ४ प्रकरणं तोतया उमेदवार, तसंच उमेदवार, स्थानिक अधिकारी आणि निरीक्षकांचा समावेश असलेल्या फसवणुकीची असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

व्यावसायिक मेसेज किंवा कॉलवर नियंत्रण मिळवण्याची सुविधा मोबाइल ॲप किंवा संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणं ट्राय अर्थात भारतीय दूरसंचार नियामक

प्राधिकरणानं मोबाइल कंपन्यांना अनिवार्य केलं आहे. ग्राहकानं जर त्याच्या कॉलचा तपशील आणि इतर माहिती नोंदवण्याची परवानगी दिली तर तक्रार नोंदणीचा तपशील आपोआप नोंदला जाईल अशी सोय करण्याची सूचना देखील ट्रायनं दिली आहे.

**<><><><>**

विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या निवडणुकीसाठी २ जुलै रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज सादर करता येतील ३ जुलै रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ५ जुलै पर्यंत आहे. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात मतदान होईल. मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक, अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि जयंत पाटील यांचा कार्यकाळ संपत असल्यानं ही निवडणूक होत आहे.

**<><><><>**

नैऋत्य मौसमी पावसानं राज्याच्या सर्व भागात पोचला आहे. गेल्या ५ दिवसात धुळे आणि नंदूरबारमध्ये मौसमी पावसाचं आगमन झालं. मध्यप्रदेशातला काही भाग, अर्ध्याहून अधिक गुजरात, छत्तीसगडमध्ये नैऋत्य मौसमी पाऊस दाखल झाला आहे.

**<><><><>**

झारखंडमधल्या लातेहार जिल्ह्यातल्या इचाबार इथून, बंदी असलेल्या कम्युनिस्ट पक्षापासून फारकत घेतलेल्या, तृतीय सम्मेलन प्रस्तुती समिती या प्रतिबंधीत गटाच्या सात सदस्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. या

माओवाद्यांकडून दोन बंदुका आणि काही कागदपत्रे जप्त केल्याची माहिती स्थानिक पोलीस अधीक्षकांनी दिली आहे.

**<><><><><>**

टी २० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे संघ पोहोचले आहे. आज झालेल्या सामन्यात डकवर्थ लुईस पद्धतीनुसार अफगाणिस्ताननं बांग्लादेशला ८ धावांनी पराभूत केलं. त्यामुळं अफगाणिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला आणि उपांत्य फेरीत जाण्याचं ऑस्ट्रेलियाचं स्वप्न भंगलं.

उपांत्य फेरीतला दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यातला सामना गुरुवारी सकाळी ६ वाजता आणि भारत आणि इंग्लंड यांच्यातला सामना त्याचदिवशी रात्री ८ वाजता होईल.

नाणेफेक जिंकून अफगाणिस्ताननं फलंदाजीचा निर्णय घेतला. २० षटकात त्यांनी ११५ धावा केल्या. पावसामुळं खेळात व्यत्यय आल्यानं बांग्लादेशला १९ षटकात ११४ धावांचं आव्हान देण्यात आलं. पण १७ षटक आणि ५ चेंडूत बांग्लादेशचा संपूर्ण संघ १०५ धावांवर बाद झाला. अफगाणिस्तानचा ४ गडी टिपणारा नवीन उल हक सामनावीर ठरला.

काल झालेल्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियाला २४ धावांनी पराभूत केलं होतं. पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघानं २०६ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मानं त्यात ९२ धावांचं योगदान दिलं. त्यानंतर खेळायला आलेला ऑस्ट्रेलियाचा संघ २० षटकात ७ गड्यांच्या मोबदल्यात १८१ धावाच करू शकला. कर्णधार रोहित शर्मा सामनावीराचा मानकरी ठरला.

**//<><><><><>//**